नि. फौजदारी खटला क्र. **१०५३/२०२३**
सरकार विरूद्ध राजकुमार वामन
**निशाणी ३४**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ ची जबानी**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : गौतम विनोद वानखडे
वय : २४ वर्षे,
धंदा : शिक्षण,
राहणार : वारूळा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

फिर्यादी विनोद वानखडे हे माझे वडिल आहेत. मी आरोपी राजकुमार वानखडे व कविता वानखडे यांना ओळखतो. ते आमचे शेजारी आहेत. दोन्ही आरोपी न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहे. घटना दोन वर्षापुर्वी ऑगस्ट महिन्यात सायंकाळी ०८:०० वाजता वणी वारूळा येथे माझे भाउ वैभव रामजी वानखडे याच्या अंगणात घडली. मी बाहेरून आलो असता मला माझे वडिल व आरोपी यांचे भांडण दिसले. मी भांडण आवरले. भांडणादरम्यान बोलाचाल चालु होती व आरोपींनी माझे वडिल फिर्यादी यांना डाव्या पायाच्या गुडघ्याला व उजव्या पायाच्या पोटरीला गोटा मारला होता. आरोपीच्या आईला फिर्यादी यांनी गोटा मारला असे आरोपींचे म्हणणे होते. मी व वैभव रामजी वानखडे यांनी भांडणाची सोडवा—सोडव केली. जो गोटा फिर्यादीला आरोपींनी मारला तो मला दाखवल्यास मी त्याला ओळखु शकत नाही. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे एस. जे. सांगोळे यांच्या मार्फत.**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी यांच्यात जुने वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांचे आरोपींसोबत घटनेच्या आधीपासुन पटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिलांचे गावात इतर लोकांसोबत देखील वाद आहे. हे

म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळी पोहचण्याच्या आधी वैभव रामजी वानखडे तेथे हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, वैभव हा आरोपी व फिर्यादीसोबत बोलत होता. हे म्हणणे खरे नाही की, वैभव बोलत असतांना भांडण चालु नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा वर्तमानपत्रातील बातम्यांचे वार्तांकन करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ याने दिलेल्या बातम्यांवरून फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी देखील फिर्यादीविरूध्द घटनेची फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष कोणतेही भांडण झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घ टनास्थळी पोहोचलो त्यावेळी केवळ बोलचाल चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, माझेसमक्ष आरोपीने गोटा मारला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ भांडणावेळी हजर नव्हती व उशिरा आली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ हिने फिर्यादीसोबत वाद घातला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद केल्याप्रमाणे आरोपींनी फिर्यादीला कोणतीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीच्या आईला जुन्या वादाच्या कारणावरून दगड मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीविरूध्द पोलीसांत तक्रार देउ नये म्हणुन फिर्यादीने आरोपींविरूध्द पोलीसांत प्रस्तुत खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे वडिलांच्या सांगण्यावरून पोलीसांना बयान दिले. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझे वडिल असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. १२.११.२०२५
अकोट